मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 17 ऑक्टोबर 2025 | पान- 1

# महापालिकेच्या वतीने 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन

## आकुर्डीतील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात पहाटे 6 वाजता होणार सांस्कृतिक मेजवानी

**पिंपरी | प्रतिनीधी**

भारतीय संस्कृतीतील प्रकाश, आनंद आणि स्नेहाचा सण असलेल्या दिवाळीच्या स्वागतार्थ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'दिवाळी पहाट' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (१८ ऑक्टोबर ) पहाटे ६ वाजता आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात भव्य स्वरूपात पार पडणार असून, शहरातील नागरिकांसाठी संगीत, नृत्य आणि कला यांचा सुंदर संगम अनुभवण्याची ही एक खास संधी ठरणार आहे.

या कार्यक्रमासाठी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती या महोत्सवाला असणार आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची देखील प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार अमित गोरखे, उमा खापरे, महेश लांडगे, शंकर जगताप, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे तसेच माजी खासदार, माजी आमदार, माजी नगरसदस्य,माजी नगरसदस्य तसेच महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे,तृप्ती सांडभोर तसेच महापालिकेतील विविध विभागप्रमुख, विविध सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार




आहेत.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'दिपगंध सुरांचा.. सुरांच्या सुवासात उजळलेली दिवाळी पहाट' हा कार्यक्रम सादर होणार आहेत. यामध्ये कोमल कृष्णा, राजेश्वरी, विनय देशमुख, गणेश मोरे हे गायक कलाकार गीत गायन करणार आहेत. तर नितीन खंडागळे, सुबोध जैन, दीपक काळे, शाम चंदनशिवे, सागर घोडके ही मंडळी वादन कलाकार म्हणून साथ देणार असल्याची माहिती क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील यांनी दिली आहे.

> “ महापालिका प्रशासनाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमधून शहरातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या माध्यमातून 'दिवाळी पहाट' सारख्या उपक्रमांद्वारे संस्कृतीचे जतन, कलावंतांना प्रोत्साहन आणि नागरिकांमध्ये सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

महानगरपालिका नागरिकांसमोर दिवाळीच्या पारंपरिक स्वरूपाची, सांस्कृतिक वारशाची आणि कलात्मक सौंदर्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहे. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात होणाऱ्या या कार्यक्रमात शास्त्रीय, सुगम, भक्तिगीत, नाट्यसंगीत तसेच लोकसंगीताच्या स्वरांनी सभागृह दुमदुमून जाईल.

'दिवाळी पहाट' या कार्यक्रमात नामांकित गायक, वादक आणि नृत्यकलावंतांची रंगतदार सादरीकरणे सादर केली जाणार आहेत. पारंपरिक पोशाख, दिव्यांच्या सजावटीसह आणि दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाला मंगल वातावरण लाभणार आहे. सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या दिवाळी पहाट कार्यक्रमाला नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून पहाटेच्या या संगीतसफरीचा आनंद घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# युवा नेते यश साने यांच्या आंदोलनाला 'यश'

## चिखलीतील अंगणवाडी रोड ते अष्टविनायक चौक रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिखली येथील अंगणवाडी रोड ते अष्टविनायक चौक या मुख्य रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा आज शुभारंभ युवा नेते यश दत्ताकाका साने यांच्या प्रमुख उपस्थितीत मोरेवास्तीतील नागरिकांच्या वतीने नारळ फोडून करण्यात आला.

अंगणवाडी रोड व चिंचेचा मळा ते वाघू साने चौक हा चिखली परिसरातील प्रमुख मार्ग पूर्णपणे खड्डेमय झाला होता. नागरिक, विद्यार्थी व वाहनचालक यांना रोज त्यांचा जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत होता. पावसाळा संपूनही रस्त्याचे डांबरीकरण न झाल्याने अखेर युवा नेते यश साने यांच्या नेतृत्वात नागरिकांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले होते. यश साने यांनी केलेल्या आंदोलनानंतर पालिका प्रशासनाला अखेर जाग आली आहे. या रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

या रस्त्यावर काही काळापूर्वी



स्ट्रोम वॉटर लाईनचे काम पूर्ण झाले होते, मात्र त्यानंतर मनपाच्या वतीने रस्त्याची दुरुस्ती न झाल्यामुळे हा मार्ग पूर्णपणे उखडला गेला होता. परिणामी नागरिकांना दररोज खड्डे, धूळ आणि असुविधांचा सामना करावा लागत होता.

> “ नागरिकांच्या सहकार्यामुळेच अशा विकासकामांना गती मिळते, हा माझा ठाम विश्वास आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांना सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार मार्ग उपलब्ध होईल. तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासात या रस्त्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहील, याची खात्री आहे.
>
> **– यश साने, युवा नेते, राष्ट्रवादी कॉँग्रेस.**

या प्रश्नांवर यश साने यांनी सातत्याने प्रशासनाशी पाठपुरावा करून अखेर हा प्रश्न मार्गी लावला आहे. आज या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असल्याचा अत्यंत आनंद आणि समाधान वाटत असल्याची भावना यश साने यांनी व्यक्त केली. या भूमिपूजनानंतर मोरेवस्तीतील नागरिकांनी त्यांचा सत्कार करून आपुलकी व्यक्त केली.

# पिंपरी चिंचवड अग्निशमन दलाची 'सुरक्षित दिवाळी' मोहीम

## फटाक्यांमुळे होणाऱ्या आगीच्या घटनांपासून बचावासाठी जनजागृती आणि आपत्कालीन तयारी पूर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळीचा आनंद साजरा करताना, गेल्या काही वर्षांत शहरात दिवाळीच्या कालावधीत घडणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत 'सुरक्षित दिवाळी' मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत आपत्कालीन परिस्थितीसाठी पूर्वतयारी तसेच विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी सुरक्षिततेच्या सूचनांचे काटेकोर पालन करून आनंददायी व सुरक्षित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




दिवाळीच्या काळात नागरिकांनी आपल्या परिसरातील पार्किंग, रस्ते, वसाहती आणि बाजारपेठांमध्ये निष्काळजीपणे फटाके फोडणे टाळावे. प्रत्येकाने स्वतःची, कुटुंबाची आणि समाजाची सुरक्षा राखावी. आग लागल्यास त्वरित १०१ या अग्निशमन नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

**अग्निशमन दल सज्ज**

दिवाळी काळात शहरात आगीच्या घटनांची शक्यता लक्षात घेऊन अग्निशमन विभाग सज्ज झाला आहे. महापालिकेच्या सर्व १० अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याचे, तसेच सर्व कर्मचारी आणि अधिकारी 'रजा रद्द' करून २४ तास कार्यरत राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्य नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून, १०१ क्रमांकावर संपर्क केल्यास तातडीने प्रतिसाद देण्यात येत आहे. फटाक्यांच्या स्टॉल परिसरात अग्निशमन वाहनांची गस्त ठेवण्यात आली आहे. फटाके विक्रेत्यांना आणि नागरिकांना लेखी व मौखिक सूचना देण्यात आल्या आहेत.

### नागरिकांनी अशी घ्यावी काळजी

- गर्दीच्या भागात, इमारतीजवळ किंवा वाहनाजवळ फटाके फोडू नयेत.
- फटाका पेटल्यानंतर जर तो फुटला नाही, तर तो पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये.
- नायलॉन/सिंथेटिक कपड्यांऐवजी सूती कपडे परिधान करावेत.
- ज्वलनशील वस्तू, गॅस सिलिंडर, विद्युत तारा किंवा पेट्रोल/डिझेलजवळ फटाके फोडू नयेत.
- फटाके फोडताना किमान दोन मीटरचे अंतर राखावे.
- पेटलेले दिवे, फटाके किंवा अर्धवट फुटलेले फटाके हाताळताना खबरदारी घ्यावी.
- फटाक्यांचा साठा घरात, वाहनात किंवा बंद जागेत ठेवू नये.
- आग लागल्यास त्वरित १०१ वर संपर्क साधावा किंवा जवळच्या अग्निशमन केंद्राशी संपर्क करावा.

> पिंपरी चिंचवड शहर जलद गतीने विकसित होत असून, नागरिकसंख्या आणि बांधकाम घनता वाढत आहे. त्यामुळे अग्निसुरक्षेचा विषय प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्याशी जोडलेला आहे. 'सुरक्षित दिवाळी' ही केवळ मोहीम नसून, नागरिकांमध्ये जबाबदार वर्तणुकीची सवय निर्माण करण्याचे पाऊल आहे. नागरिकांनी देखील या मोहिमेला सहकार्य करावे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# पालकमंत्र्यांचा 'जनसंवाद'; भाजपने केली 'जन की बात'!

## चिंचवड मतदारसंघात आमदार जगताप यांच्याकडून नागरिकांच्या तक्रारीचे निवारण

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका पुन्हा ताब्यात घेण्यासाठी शहरात भाजप आणि राष्ट्रवादी प्रचंड प्रयत्नशील आहेत. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्यातील पालकमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहरात जनसंवाद, परिवार मिलन, पाहणी दौरे यांसारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेच्या संपर्कात जास्तीत जास्त जाण्याचा प्रयत्न करत असतानाच याला भाजपकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात येत आहे. याचाच भाग म्हणजे बुधवारी अजित पवारांनी शहरात जनसंवाद घेतला त्याच्याच दुसऱ्या दिवशी भाजपकडून आमदार शंकर जगताप यांनी ' जन की बात ' या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांशी विविध तक्रारीवर संवाद साधला.

अजित पवारांचा जनसंवाद कार्यक्रम चिंचवड विधानसभेत पार पडल्यानंतर अवघ्या चोवीस तासांत भाजपचे आमदार शंकर जगताप यांनी "जन की बात" या संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले. रहाटणी, काळेवाडी या भागामध्ये ज्योतिबा मंगल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका विभागाशी संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. आलेल्या तक्रारीचे थेट अधिकाऱ्यांकडे विचारणा करत त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना या कार्यक्रमात करण्यात आल्या. नागरिकांकडूनही या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. एका आठवड्याभ राची मुदत देत या तक्रारींचे पुन्हा एकदा सर्वेक्षण केले जाईल असे देखील आमदार जगताप यांनी सांगितले.




अजित पवार यांच्या जनसंवाद कार्यक्रमाविषयी बोलताना जगताप म्हणाले, "अजित पवार हे मोठे नेते आहेत, उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना शह देण्यासाठी मी कार्यक्रम घेत नाही. आम्ही महायुती म्हणूनच काम करतो."' जन की बात' मधून मी नागरिकांचं म्हणणं ऐकतो." असेही जगताप यावेळी म्हणाले.

**सातत्यपूर्ण नागरिकांशी संवाद - जगताप**

आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केलं की, "आमदार झाल्यापासून लोकांशी संवाद हा माझा सातत्याने सुरू असलेला उपक्रम आहे. हा कोणाला उत्तर देण्यासाठी नाही, केवळ योगायोग आहे." त्यांनी सांगितलं की, आतापर्यंत "आमदार आपल्या दारी" या माध्यमातून १३ मेळावे घेतले असून हजारो तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. आता प्रत्येक प्रभागात "जन की बात" अंतर्गत थेट नागरिकांशी संवाद साधून अडचणी सोडवल्या जात आहेत.

नगरसेवक नसल्याने नागरिकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत."त्या सोडवण्यासाठी आम्ही थेट लोकांशी संवाद साधत आहेत. यातून लोकांची सेवा हेच उद्दिष्ट असल्याचे जगताप म्हणाले.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये राजकारण तापायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीमध्ये राजकीय रंग चांगला चढणार असल्याचे दिसत आहे. यातच भाजपचा पारंपरिक गड मानल्या जाणाऱ्या चिंचवड मतदारसंघात तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसने "फोकस" केल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने अनेकदा प्रयत्न केले, मात्र प्रत्येक वेळी या मतदारसंघात भाजपानेच मुसंडी मारली.

# बालभारती ते पौड फाटा रस्त्याचा 'सर्वोच्च' अडथळा दूर!

## सर्वोच्च न्यायालयाने उठवली स्थगिती; पर्यावरण विभागाची परवानगी घेऊन काम सुरू करण्याचे महापालिकेला आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

बालभारती ते पौड फाटादरम्यान वेताळ टेकडीवरून प्रस्तावित रस्त्याचा मार्ग अखेर सर्वोच्च न्यायालयाने मोकळा केला आहे. हा रस्ता करण्यापूर्वी महापालिकेने पर्यावरण परवानगी घ्यावी, असे आदेश देत हे काम करण्यास न्यायालयाने मान्यता दिली आहे. या रस्त्यामुळे कोथरूड आणि शिवाजीनगर परिसरातील वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, विधी महाविद्यालय रस्त्याला पर्याय होणार आहे. हा रस्ता कर्वे, तसेच सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महत्त्वाचा असल्याची बाब दैनिक प्रभातने सातत्याने वेगवेगळ्या वृत्तांच्या माध्यमातून मांडली होती. महापालिकेनेही न्यायालयात हीच भूमिका कायम ठेवत बाजू मांडली अखेर सर्वोच्च न्यायालयानेही त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

सुमारे दोन किलोमीटर लांबीचा हा रस्ता भांडारकर संस्थेजवळील टेकडीवरुन जाणार आहे. हा रस्ता करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर या निर्णयाच्या विरोधात डॉ. सुषमा दाते व डॉ. सुश्मिता काळे, आय.एल.एस. विधी महाविद्यालय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती विनोद चंद्र यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची आज सुनावणी झाली. त्यात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने महापालिकेला एन्व्हायर्न्मेंट क्लिअरन्स घेऊनच पुढील काम करावे, असे आदेश दिले. न्यायालयाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर अधिक तपशील समजू शकेल, असे महापालिकेच्या विधी अधिकारी निशा चव्हाण यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, ॲड. अभिजीत कुलकर्णी, ॲड. राहुल गर्ग, ॲड. धवल मल्होत्रा आणि ॲड. निशा चव्हाण यांनी बाजू मांडली. शिवाजीनगर आणि कोथरूड परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा रस्ता पर्यायी मार्ग ठरू शकतो. प्रकल्पाचा खर्चही या कालावधीत काही पटीने वाढला आहे, ही बाब महापालिकेच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याचे निशा चव्हाण यांनी सांगितले.




### का रखडला होता रस्ता?

- हा मार्ग वेताळ टेकडीच्या हरित पट्ट्यातून जात असल्याने येथील झाडांची तोड होईल, अशी भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली होती..
- यामुळे पर्यावरणवादी संघटनांनी हा मार्ग तयार करण्यास विरोध दर्शवला.
- नागरी चेतना मंच, सुषमा दाते व इतर पर्यावरणप्रेमींनी याप्रकरणी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केल्याने या रस्त्याच्या कामाला स्थगिती देण्यात आली होती.
- सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटीने रस्त्याचा भाग डिम फॉरेस्टमध्ये मोडतो, असे निरीक्षण देत या रस्त्याचे काम थांबविण्याची सूचना दिली होती.
- वेताळ टेकडीतील झाडे, जैवविविधता आणि भूजल पातळीवर परिणाम होईल, डोंगर फोडून रस्ता केल्याने पर्यावरणीय समतोल बिघडेल तसेच विद्यमान रस्त्यांचे सुयोग्य नियोजन केल्यास हा नवीन रस्ता आवश्यक नाही, असे पर्यावरणवाद्यांचे म्हणणे होते.

### असा आहे रस्ता प्रकल्प

- अंतर : सुमारे 2.1 ते 2.3 किमी
- रुंदी : अंदाजे 30 मीटर
- काम करणारी संस्था : पुणे महानगरपालिका
- उद्दिष्ट : कोथरूड-शिवाजीनगर वाहतुकीवरील ताण कमी करणे.
- अंदाजित खर्च : 160 कोटी रुपयांच्या आसपास

> "या रस्त्यास न्यायालयाने मान्यता दिल्याने विधी महाविद्यालय रस्त्याला पर्यायी रस्ता निर्माण होणार आहे. त्यामुळे कर्वे रस्ता, सेनापती बापट रस्ता, विधी महाविद्यालयाच्या रस्त्याला जोडणाऱ्या प्रभात रस्ता, भांडारकर रस्ता, तसेच मराठवाडा मित्रमंडळ महाविद्यालयाच्या रस्त्यावर येणारा वाहतुकीचा ताण कमी होणार आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाची प्रत प्राप्त होताच पर्यावरण प्रमाणपत्र घेण्यासाठी तत्काळ अर्ज केला जाईल. महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार हा रस्ता केला जाईल.."
>
> **- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख,महापालिका**

# महापालिकेतील लेटलतिफांना बसणार चाप; बायोमेट्रिकसह 15 दिवसात यंत्रणा करणार अद्ययावत

## येत्या 15 दिवसांत ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी विद्युत विभाग व आयटी विभागाच्या प्रमुखांना दिले

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांची हजेरी घेण्यासाठी बसविण्यात आलेल्या यंत्रणेची निविदा संपल्याने गेल्या तीन महिन्यांपासून अनेक कर्मचारी उशिरा येत असल्याचे निष्पन्न झाले आहे. येत्या 15 दिवसांत ही यंत्रणा कार्यान्वित करण्याचे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी विद्युत विभाग व आयटी विभागाच्या प्रमुखांना दिले असून, ही यंत्रणा मुदतीत सुरू न झाल्यास कारवाई करण्याचा इशारादेखील त्यांनी दिला आहे.

पुणे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाची वेळ ही सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 अशी आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने, अधिकाऱ्याने यावेळेत कामावर यावे, असा नियम आहे. जर कामासाठी म्हणून बाहेर जाणार असाल, तर त्याची माहिती वरिष्ठांना दिली पाहिजे, कार्यालयात त्याची नोंद करून ठेवली पाहिजे. मात्र तसे होताना दिसत नाही. हजेरी यंत्रणा व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी ही विद्युत विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि आयटी विभाग यांची असताना निविदा संपूनही हजेरी यंत्रणा अद्ययावत करणी आली नाही. त्यामुळे हजेरी यंत्र बंद असतांना कर्मचाऱ्यांना पगार मिळत होता. याबाबत आयुक्त नवल किशोर राम यांना विचारले असता त्यांनी लवकरच ही यंत्रणा कार्यान्वित केली जाणार असल्याचे सांगितले.

यासाठी विद्युत व आयटी विभागाला 15 दिवसांचा वेळ दिला आहे. 1 नोव्हेंबरपासून ही यंत्रणा सुरू होईल, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी आयुक्त नवल किशोर राम यांच्यासमोर दिली, असे न झाल्यास संबंधित विभागाच्या प्रमुखांवर कारवाई केली जाईल, असे आयुक्त राम म्हणाले.




### नवे टेंडर कशासाठी?

- पुणे महापालिकेत हजेरी होत नसल्याचे उघड झाल्यावर आता पालिकेने हजेरी यंत्रणेसाठी नव्याने खासगी कंपन्यांना टेंडर काढण्याचे ठरविले आहे. हा खर्च 200-400 कोटींवर जाणार आहे. खरे तर केंद्र सरकारने निर्देशित केलेली 'एनआयसी'ची कार्यक्षम, पारदर्शी आणि अतिशय स्वस्तातील आधार बेस्ड हजेरी यंत्रणा अतिशय स्वस्तात 2 ते 5 कोटी रुपयांत होणे शक्य असतांना तसेच ही यंत्रणा वापरण्याच्या केंद्र आणि राज्याच्या सूचना असतानादेखील खासगी टेंडरचा घाट कशासाठी? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.


# बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अजित पवारांनी घेतले महत्त्वाचे निर्णय

## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शाश्वत उपाययोजना निश्चित करण्यासाठी मा. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक झाली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शाश्वत उपाययोजना निश्चित करण्यासाठी आज उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक झाली. पिंपरखेड येथील नुकत्याच झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, मनुष्यहानी आणि पशुहानी टाळण्यासाठी त्वरित आणि निर्णायक उपाययोजना राबवण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी वन विभागाने हल्ले रोखण्यासाठी आणखी २०० पिंजऱ्यांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

त्यानुसार आमदार अतुल बेनके यांच्या मागणीनुसार या २०० पिंजऱ्यांसाठी जिल्हा नियोजन समितीतून २ कोटी २३ लाख रुपयांचा निधी तात्काळ मंजूर करण्यात आला आहे. वन अधिकाऱ्यांना पिंजऱ्यांची संख्या वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.ही बैठक भविष्यातील उपायांसाठी दिशादर्शक ठरली असून, बिबट्यांशी संबंधित संकटावर ठोस आणि कायमस्वरूपी उपाय राबविण्याचा निर्धार अधिक दृढ करण्यात आला आहे.



### केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्र्यांनाही दिली माहिती

» बैठकीत बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच उपाययोजनांवर चर्चा करताना थेट केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री भूपेंद्र यादव यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. जिल्ह्यात चार तालुक्यांतील बिबट्यांच्या वाढत्या संख्येची माहिती यादव यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यावेळी यादव यांनी नसबंदी करण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली. तसेच गुजरात राज्यातील वनतारा प्रकल्पाअंतर्गत सुमारे पन्नास बिबटे पाठविण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून यापूर्वीच उच्च न्यायालयात अपील आणि केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. बिबट हालचालींचे कार्यक्षम निरीक्षण करण्यासाठी बिबट प्रवण क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित आणखी ५० युनिट्स वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या. शेतकरी, मेंढपाळ आणि रेस्क्यू टीमला आवश्यक साहित्य पुरवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून देण्याबाबतही सहमती झाली.

अजित पवार म्हणाले, या चारही तालुक्यांत शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करण्यात येणार आहे. त्यासाठी महावितरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी लोकेश चंद्रा यांच्याशी संपर्क साधून यासंदर्भात त्यांना सूचना करण्यात आली. त्यासाठी उपकरणे लागणार असून 31 ऑक्टोबरपर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

### बैठकीत झालेल्या शाश्वत उपाययोजना..

» आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील आकोले, पारनेर या तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांना ऑक्टोबर अखेरपर्यंत दिवसा वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. माणिकडोह बिबट निवारण केंद्राची क्षमता वाढवण्यावर आणि शिरूर येथे नवीन रेस्क्यू सेंटर स्थापन करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. बिबट्यांच्या नसबंदीबाबत केंद्रीय वनमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच पुढील बैठकीत तोडगा काढला जाईल.

### जिल्हाधिकारी काय म्हणाले?

» राज्यस्तरावरही काही गोष्टी करण्यासाठी राज्य सरकार गांभीर्याने विचार करत आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने वन विभागासोबत बैठक घेऊन उपाययोजनांचा सविस्तर आराखडा राज्य सरकारला सोपविला आहे. याबाबत लवकरच धोरण तयार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

---

# जेजुरी नगरपालिका! स्थानिक समीकरणे बदलणार ; कोण कोणाशी हातमिळवणी करणार याकडे लक्ष

## गट-गण आरक्षण सोडतीनंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जेजुरी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण हे सर्वसाधारण खुला प्रवर्गासाठी जाहीर झाल्यामुळे जेजुरीतील इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर दोन ते तीन वर्षे निवडणूक लढण्याची तयारी करणाऱ्यांनी लगेच सोशल नेटवर्किंगवरुन संपर्क फोनाफोनी सुरु केली आहे. इच्छुकांनी हायकमांडकडे आपल्या नावासाठी समर्थक कार्यकर्त्यांना श्रेष्ठींकडे आपल्या नावाचा आग्रह धरण्यासाठी फिल्डींग सुरू करावी, निरोप पाठविण्यासाठी सुरुवात केली आहे.



मागील पंचवार्षिक निवडणुकीत नगराध्यक्षपद आरक्षण इतर मागास प्रवर्ग महिलेसाठी आरक्षित होते. यावेळी आरक्षण सर्वसाधारण प्रवर्गासाठी येईल, अशी अपेक्षा धरत अनेकांनी जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला होता. आरक्षण सर्वसाधारण खुला प्रवर्गासाठी झाल्यामुळे त्यांना मोठी संधी निर्माण झाली आहे. मागील निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना अशी तिरंगी लढत झाली होती. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये खरी लढत झाली होती. मात्र, आतापर्यंत महाराष्ट्रात सर्वच पक्षांमध्ये झालेली स्थित्यंतरे आणि सद्य परिस्थिती वेगळी निर्माण झाली आहे. सात ते आठ वर्षात बरेच पुलाखालून पाणी वाहून गेलेले आहे.

नगरपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट एकत्र येणार का, याबाबत अद्याप सस्पेन्स आहे. अजून काहीही सांगता येत नाही. मात्र, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना शिंदे गट, मनसे यांचे नगराध्यक्षपदासाठी अधिकृत उमेदवार असण्याची शक्यताही नाकारता येणार नाही.

### महायुती आघाडी धर्म पाळणार काय..

» जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीत स्थानिक पातळीवर कोणता पक्ष कोणाशी युती करणार, याची उत्सुकता लागून राहिली आहे. राज्याच्या सत्तेत असलेल्या भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट यांच्यामध्ये युती होणार का, असा संभ्रम नागरिकांमध्ये आहे. मनसेची भूमिका काय असणार, याबाबत चर्चा सुरू आहे. पुण्यातील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे वक्तव्य केल्यानंतर महायुतीमधील घटक पक्ष हे आघाडी धर्म हे कितपत पाळणार, याचीच चर्चा रंगली आहे.